# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०५/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## अवैध रेती वाहतुकीवर
## —: नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही :—

पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ दिनांक ०१.०५.२०२४ रोजी अवैध धंदयांवर आळा घालणेकामी पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता खात्रीशिर माहिती मिळाली की, मौजा रायवाडी शिवारातील कन्हान नदीचे पात्रातून ट्रॅक्टर ट्रॉली द्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा माहितीवरून मौजा रायवाडी शिवार येथे नाकाबंदी करीत असतांना १) महिन्द्रा ट्रॅक्टर क्र. एम एच— ४०/सी ए —६८४० व एक लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— विशाल ज्ञानेश्वर वाघाडे, वय २१ वर्ष, रा. बडेगाव** २) महिन्द्रा ट्रॅक्टर क्र. एम पी—२८/ए सी ४४५२ व ट्रॉली क्र. एम एच— ४०/सी क्यु ५५७६ चा चालक **आरोपी नामे—दिनेश भैय्यालाल धुर्वे, वय २६ वर्ष, रा. लांबटपुरा खापा** ३) महिन्द्रा ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/एल ३८७३ व एक लाल रंगाची बिना नंबरची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— संदिप शिवनंदन मरस्कोल्हे, वय २१ वर्ष, रा. बडेगाव** यांना थांबवुन विचारपुस केली असता त्याचे ताब्यात कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसुन ते आपआपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती शासनाचे महसुल बुडवित चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन १) महिन्द्रा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/सी ए —६८४० किंमती ५०००००/—रू. एक लाल रंगाची बिना नंबरची ट्रॉली किंमती ७००००/—रू. मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ३०००/—रू. २) महिन्द्रा ट्रॅक्टर क्र. एम पी—२८/ए सी ४४५२ किंमती ५०००००/—रू. निळया रंगाची ट्रॉली क्र. एम एच ४०/सी क्यु— ५५७६ किंमती ८००००/— रू. मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ३०००/— रू. ३) महिन्द्रा ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/एल ३८७३ किंमती ५०००००/—रू. एक लाल रंगाची बिना नंबरची ट्रॉली किंमती ७००००/— रू. मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ३०००/— रू. तिन्ही ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये प्रत्येकी ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती प्रमाणे ०३ ब्रास रेती किंमती ९०००/— रू. असा एकुण वाहनासह १७२९०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूद्ध कलम ३७९ भादंवि सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन नहसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७ सहकलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि सुनिल दहीभाते, पोहवा नरेश गाते, सफौ नारायण बोरकर, पोशि रेवतकर यांनी पार पाडली.

# वेलतूर येथील म.रा.वि.वि कंपनीचे विदयुत ट्रान्सफार्मर चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पोस्टे वेलतूर अंतर्गत दिनांक ०१/०५/२०२४ रोजी मौजा रूयाड येथे आरोपीतांनी संगनमत करून अरून तितरमारे रा. रूयाड यांचे शेतातील म.रा.वि.वि.चे ट्रन्सफार्मर वजन अंदाजे ६० किलो किंमती ४० हजार रू. चे ट्रान्सफार्मर ची चोरी केली. अशा फिर्यादी पंकज चंद्रदास भोंडे, वय ३२ वर्ष, रा. चन्ना ता. कुही यांचे रीपोर्ट वरून पोस्टे वेलतूर येथे अप क्र. ७८/२४ कलम ३७९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर चोरीच्या गुन्हयातील आरोपींचा शोध वेलतूर पोलीस घेत असता गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम हे रूयाड शेत शिवारात संशयास्पद स्थितीत फिरत आहे, अशा खात्रीशीर मिळालेल्या खबरेवरून वेलतूर पोलीस स्टाफ घटनास्थळी जावुन सापळा रचुन **आरोपी नामे— १) तस्वीर लक्ष्मण सोनबावने, वय २२ वर्ष, रा. धानला ता. कुही २) दिलीप नागो सोनबावणे, वय २९ वर्ष, रा. धानला ता. कुही** यांना ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी रूयाड येथील अरूण तितरमारे यांचे शेतातील धुऱ्यावरील म.रा.वि.वि. कंपनीचे विदयुत ट्रान्सफार्मर वजन अंदाजे ६० किलो किंमती ४०,०००/—रू. चोरून नेल्याचे कबुल केले. तसेच गुन्हयात वापरलेली स्पलेंडर मोसा क्र. एम. एच—३२/टी—८४२८ किंमती २०,०००/—रू. असा एकुण ६०,०००/— रू. चा मुद्देमाल आरोपींकडुन हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे वेलतूर ठाणेदार सपोनि सतिश पाटील, पोशि अमोल झाडे, रोहीत आडे, संदेश रामटेके, सद्दाम शेख यांनी पार पाडली. गुन्हयाचा पुढील तपास सफौ अशोक जाधव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर